# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 Impact Factor - 7.139 Indexed [illegible]

March 2020 Special Issues- 25 Vol. 2

# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Chief Editor
Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)

Dr. S. S. Undare (Vice Principal)
Dr. G. A. Mohite (Vice Principal)

Editor
Dr. R. K. Kale

Co-Editors
Dr. S. N. Akulwar
Dr. B. D. Jadhavar
Dr. S. E. Ghumatkar

Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded



57. महिला सबलीकरण आणि भारतीय धोरण 215
डॉ. खेत्री कुंडलिक रघुनाथ,
58. जम्मु काश्मिर , कलम ३७० आणि ३५८(अ) 218
लखन बाळु कुंभारे
59. "वस्तू व सेवा कर; भारतीय नवआर्थिक युगाची पहाट" 221
लखन देविचंद सुर्यवंशी
60. महिला सशक्तिकरण व भारत सरकारचे धोरण 226
लव्हाळे दत्ताराम नारायण
61. नागरिकत्व सुधारणा कायदा २०१९ 229
प्रा.डॉ.बी.बी.लोंखडे
62. "भारतीय संयुक्त कुटूंब पध्दतीचा ऱ्हास" 234
प्रा.डॉ. माया बापूराव मसराम
63. दहशतवाद 238
प्रा. मच्छिंद्रनाथ मारुती सुर्यवंशी
64. नक्षलवाद : भारतातील एक समस्या" 241
माधव चांदु वाघमारे
65. भारतीय संसदीय लोकशाही आणि आघाड्यांचे राजकारण 244
प्रा.डॉ. माधव चोले
66. भारतीय संविधान आणि लोकशाही मुल्ये 248
प्रा.मगरे.एम.के.
67. भारतीय समाजातील वाढती बेकारी (Unemployment Growth in IndianSociety) 251
प्रा.डॉ. बी.एल. म्हस्के
68. दहशतवाद : भारतासमोरील एक आव्हान 253
माने परमेश्वर मुक्तीराम
69. वस्तु व सेवांच्या संदर्भात भारताच्या विदेशी व्यापाराची रचना 255
डॉ. वैशाली ल. देशमुख
70. भारतातील बेकारी : कारणे आणि उपाय 259
प्रा. आचार्य बालाजी वैजनाथ
71. दहशतवादाचे बदलते स्वरूप 262
आकाष शेषराव बांगर
72. जातिवाद ( casteism ) 265
डॉ. आर. के. काळे, मोरे संजय दिनकर
73. महिला सबलीकरणामध्ये शासकीय योजनांचे योगदान 270
श्री. अंबुरे ऋषिकेश सर्जेराव
74. भारतीय शेतकरी चळवळ 273
अनिल मारोतराव जाधव
75. "भारतातील वाढत्या बेरेजगारीची कारणे व त्यावर सरकारने केलेल्या उपाययोजना" 275
अर्चना विश्वनाथराव आरमाळकर

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 25 , Vol. 2 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# भारतीय संसदीय लोकशाही आणि आघाड्यांचे राजकारण

**प्रा.डॉ. माधव चोले**
सहयोगी प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर, राज्यशास्त्र विभाग देगलूर महाविद्यालय देगलूर.

---

**प्रस्तावना**

ब्रिटिश वसाहात काळात ब्रिटिशांनी केलेल्या विविध प्रशासकिय सुधारण अधिनियमामुळे भारतात लोकशाही राजकारणाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. आणि स्वातंत्र्यानंतर संविधानकारांनी विविध देशांचे संविधान आणि शासनप्रणाल्यांचा सखोल अभ्यास करुन आपल्या देशाच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीस अनुकुल अशा पध्दती, तत्त्वे यांची शहानिशा करुन त्याचा संविधानात समावेश केला. २६ जानेवारी १९५० ला संविधानाची अंमलबजावणी होऊन. या संविधानानुसार भारतात अधुनिक संसदिय लोकशाहीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली.

विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळ परस्पर घनिष्ठ संबंधित असुन कार्यपालिकेची निर्मिती विधिमंडळातुन होईल आणि कार्यपालिका आपल्या कार्याबद्दल विधिपालिकेस जबाबदार राहिल यालाच संसदीय अथवा जबाबदार शासन पध्दती असे म्हणतात. संविधानात संसदेच्या 'मर्यादित सार्वभौमत्व' या तत्वाचा स्वीकार केलेला आहे. संविधानानुसार संसदेची भुमिका विधिनिर्माण, शासनावर देखरेख व नियंत्रण आणि योग्य दिशेने सरकारला प्रभावित करणे आहे.

**संसदीय लोकशाहीची व्यवहारिक भुमिका :**

संसदिय लोकशाहीची भुमिका ही पक्षपध्दतीचे स्वरुप, नेतृत्व आणि संसदेतील पक्षाचे बहुमत अथवा अल्पमत यावरुन बदललेली आहे. १९५० ते १९९० पर्यंत फक्त १९७७, १९७९, १९८९ चा अपवाद वगळता भारतात एकपक्ष प्रभुत्व पध्दती, आणि प्रभावी नेतृत्व असल्याने पंतप्रधानाची भुमिका ही अध्यक्षात्मक स्वरुपाची होती परिणामी संसद शक्तीहिन बनली होती. मात्र १९९६ पासुन आघाड्यांच्या राजकारणात कार्यपालिकेची शक्ती कमी होवून संसदेच्या शक्तीत वाढ झाल्याचे दिसते.

**एकपक्ष प्रभुत्व पध्दत आणि पंतप्रधानाची अध्यक्षात्मक भुमिका (१९५० ते १९९०) :**

१९५० पासुन १९९० दीच्या दशकापर्यंत फक्त १९७७, १९७९, १९८९ चा अपवाद वगळता केंद्रात काँग्रेसलाच स्पष्ट बहुमत होते. १९६७ च्या राज्यविधानसभा निवडणुकीत आठ राज्यात गैर काँग्रेसची सरकारे अस्तित्वात आलेली होती. तरीही भारतात एकपक्षप्रभुत्वशाही होती. या काळात पंतप्रधानाची भुमिका अध्यक्षात्मक स्वरुपाची होती. कारण एकाच पक्षाला स्पष्ट बहुमत, पं.नेहरु, इंदिरा गांधी, राजीव गांधी सारखे नेतृत्व, दिर्घकाळ सतत दुर्बल विरोधी पक्ष, पंतप्रधाना पदास पक्षांतर्गत जवळपास स्पर्धा नव्हती, संविधानात उपपंतप्रधानपदाचा अभाव आणि निवडणुकीत व्यक्तीपुजेला आलेले महत्त्व या कारणांमुळे पंतप्रधानाची भुमिका अमेरिकन अध्याक्षांसारखी बनल्यामुळे मंत्रीमंडळ आणि संसदेचे कार्य हे सल्ला आणि संमती देण्याचे राहिलेले आहे.

संसदेच्या भुमिकेबद्दल डॉ.लक्ष्मीमल्ल सिंघवीच्या मते "हे सत्य आहे की कायदे निर्माण करणे व कर लावण्याचे अधिकार संसदेस आहेत पण वास्तवात विधि अधिनियमाचे गर्भाधान आणि जन्म मंत्रीमंडळात होते तर संसदेत केवळ मन्त्रोचारणा बरोबरच उपनयनसंस्कार केला जावून औपचारिक मान्यता दिली जाते."

प्रो.जे.डी. सेठीच्या मते - "सिध्दांतानुसार मंत्रीमंडळ संसदेची मर्जी असेपर्यंत सत्तेवर असते पण व्यवहारात मात्र मंत्रीमंडळाने संसदेचे कार्य आणि अधिकार अधिकाधिक आपल्या हातात घेतले आहेत त्यामुळे मंत्रीमंडळाची तानाशाही निर्माण झाली आहे"

हम्फ्री बर्कलेच्या मते - "पंतप्रधानाच्या अध्यक्षात्मक भुमिकेमुळे संसदेच्या सर्वोच्चता सिध्दांत भंग पावला आहे. त्यामुळे संसद फक्त रबरी स्टॅम्प प्रमाणे संमती देण्याचे औपचारिक कार्य करित आहे."

**आघाडयांचे राजकारण आणि संसदीय लोकशाही :**

१९७० च्या दशकात अनेक राज्यात वाढत्या राजकिय भानामुळे प्रादेशिक पक्षांचा उदय वेगवेगळ्या कारणांनी झाला. भारतातील प्रादेशिक विविधता, सांस्कृतिक विविधता, स्थानिक मुद्दे जातीगत भावना, प्रादेशिक विकासाचा असमतोल, पक्षांतर्गत गटबाजी, व्यक्तीकेंद्रीत राजकारण, सशस्त्र लढ्यातुनही प्रादेशिक पक्षांचा उदय झालेला आहे. उदा. उत्तरप्रदेशात मुलायमसिंगाचा समाजवादी पक्ष, बिहारमध्ये लालूप्रसाद यादवांचा राष्ट्रीय जनता दल, ओरिसात नवीन पटनाईकचा बिजु जनतादल, तामिळनाडुत द्रमुक आणि अण्णा द्रमुक, महाराष्ट्रात शिवसेना, पंजाबमध्ये अकाली दल, झारखंड मध्ये सेबु सोरेनचा झारखंड पक्ष, तर जम्मु-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्स, केरळमध्ये मुस्लीम लीग, असे

प्रादेशिक पक्ष भारतीय राजकारणात अस्तित्वात आली या पक्षांनी स्थानिक मुद्यांचा आधार घेवून, प्रभावी राजकारण करुन राज्यतील सत्ता काबीज केली. १९६७ च्या राज्यविधानसभा निवडणूकीत आठ राज्यात गैरकॉंग्रेसची सरकारे अस्तित्वात आल्यामुळे भारतीय राजकारणात कॉंग्रेसच्या एक पक्ष प्रभुत्वशाहीला उतरती कळा लागण्यास सुरुवात झाली. १९८० ला अस्तित्वात आलेल्या भाजपाने हिंदुचा सांस्कृतिक राष्ट्रवाद, समान नागरी कायदा, राम मंदिर, आक्रमक संरक्षण धोरण, जम्मु काश्मीरचे ३७० कलम रद्द करणे हे मुद्दे घेवून राजकारणात प्रभाव निर्माण केला. त्यामुळे भारतीय राजकारणात बहुपक्षपध्दती अस्तित्वात आली.

**आघाड्यांच्या राजकारणाची अपरिहार्यता :**

१९९० च्या दशकात सार्वजनिक निवडणुकात शासन निर्माण करण्या इतपत स्पष्ट बहुमत कोणत्याच पक्षाला न मिळाल्याने, कोणत्याही पक्षाला राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांच्या सहकार्याने, त्यांच्या कांही शर्ती, प्रस्ताव, अटी मान्य करुन संयुक्त सरकारे निर्माण करण्याची प्रक्रिया सुरु झाली असे संयुक्त सरकारे निर्माण होण्याचे कारण - बहुपक्षपध्दतीचे स्वरुप, एकाच पक्षाला स्पष्ट बहुमत नाही, प्रादेशिक पक्षांचा वाढता प्रभाव, नेतृत्वामध्ये स्पर्धा, पक्ष बदलाची प्रवृती, पक्षांतर्गत गटबाजी, या कारणांनी भारतीय राजकारणात आघाडी सरकारे अस्तित्वात आली.

पहिल्यांदा १९७७ मध्ये मोरारजी देसाईच्या नेतृत्वाखाली, समाजवादी पक्ष, भारतीय जनसंघ, संघटना कॉंग्रेस, लोकदल आणि जनता दलाने आघाडी शासन निर्माण केले. मात्र १९७९ ला आपसातील मतभेदांमुळे हे शासन संपुष्टात आले. या अनुभवामुळे आघाडीचे शासन चालविणे किती कठिण असते याची जाणीव झाली. यानंतर १९७९ ला चरणसिंगाचे १९८९ ला विश्वनाथ प्रतापसिंगाचे, १९९० ला देवेगौडाचे, १९९७ ला इंद्रकुमार गुजरालचे, १९९८ भाजपाने वाजपेयीच्या नेतृत्वाखाली, रालोआ आघाडी शासन निर्माण केले. मात्र जयललिताने पाठिंबा काढून घेतल्योन केवळ १३ दिवसातच सरकार अस्थिर बनले. १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपा एक मोठा पक्ष म्हणून पुढे आला भाजपाने रालोआ शासन निर्माण केले हे शासन २००४ पर्यंत होते. २२ मे २००४ मध्ये मनमोहनसिंगाच्या नेतृत्वाखाली, राष्ट्रीय जनतादल, भाकप, माकप, पी.डी.पी., जनशक्ती, राष्ट्रवादी कॉंग्रेस, तेलंगणा राष्ट्र समिती, द्रमुक आणि इतर पक्षांच्या सहकार्याने युपीए शासन निर्माण केले. आता २००९ मध्ये परत कॉंग्रेसची ताकत वाढल्याने मनमोहनसिंगाच्याच नेतृत्वाखाली युपीए सरकार अस्तित्वात आलेले आहे. अशा आघाड्यांच्या राजकारणात भारतीय संसदिय लोकशाहींच्या भुमिकेत बदल झालेला आहे.

**आघाडी शासनात पंतप्रधानाची भुमिका :**

आघाडी शासनात पंतप्रधानापेक्षा मंत्र्याचेच पारडे जड असते. आघाडीतील सहकारी पक्षाच्या दबावाखाली प्रधानमंत्री वावरत असतो. मंत्रीमंडळात कोणाला घ्यावे, कोणाकडे कोणते खाते सोपवावे आणि महत्वाच्या प्रश्नावर कोणते निर्णय घ्यावेत याबाबतीत पंतप्रधानाची भुमिका पुर्वी इतकी निर्णायक राहिलेली नाही. आघाडी शासनात पंतप्रधान प्रादेशिक पक्षांच्या हातातील बाहुले बनले आहे. त्याची भुमिका १) मंत्री मंडळातील सर्व पक्षांच्या मंत्र्याच्या सहकार्याने धोरणे निर्माण करावी लागतात. २) मंत्रीमंडळाच्या निर्मिती होण्यास वेळ लागतो. ३) परराष्ट्रांशी तह, करार करतांना पहिल्यांदा संसदेत त्यावर चर्चा करुन सहमती घेवूनच करावे लागते. अर्थात पंतप्रधानाच्या भुमिकेपेक्षा संसदेची सहमती महत्वाची बनली आहे. उदा. मनमोहनसिंगाने अमेरिकेशी अणु करार करतांना संसदेत मार्क्सवाद्यांनी विरोध करुन पाठिंबा काढून घेतला होता. ४) पंतप्रधानाला पावलो-पावली तडजोडी कराव्या लागतात, सर्वच पक्षांच्या नेत्यांना खुश ठेवण्यासाठी मंत्रीमंडळाचा विस्तार करावा लागतो त्यातुनच मंत्रीमंडळाचा आकार सतत फुगत राहतो. ५) वास्तविकता जबाबदारीने कार्य करण्यापेक्षा विविध पक्षांच्या मंत्र्यामध्ये समन्वय व सहकार्य साधण्यातच प्रधानमंत्र्याची शक्ती वाया जाते.

**राजकारणांचे प्रादेशिकरण :**

आघाड्यांच्या राजकारणात प्रादेशिक पक्षांची भुमिका निर्णायक ठरु लागल्याने भारतात केंद्रीय राजकारणाचे प्रादेशिकरण झालेले आहे. प्रादेशिक पक्ष आपापल्या शर्ती, अटी, प्रस्ताव मान्य करुन घेण्यासाठी दबावाचे राजकारण करतात. प्रादेशिक हिताला प्राध्यान्य देवून आपापले हित साध्य करण्याचा प्रयत्न करतात शिवाय राज्याला फायदा होईल असे खाते पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न करतात. उदा. १९९९-२००४ या काळात जनता दल (यु) नितिशकुमारने रेल्वेमंत्री पद तर युपीए सरकारमध्ये लालु प्रसाद यादव आणि रामविलास पासवान यांच्यात रेल्वेमंत्री पदासाठी स्पर्धा होती. तेलगु देशमचे चंद्राबाबु नायडूने १९९६ ते २००४ मध्ये जवळपास ८ वर्षे आघाडी शासनात सहभाग घेवून पुर्ण फायदा घेवून केंद्रीय राजकारणात आपला प्रभाव निर्माण केला होता.

आपापले प्रादेशिक हित साध्य होत नसल्यास शासनाचा पाठिंबा काढून घेण्याच्या धमक्या दिल्या त्यामुळे आघाडी शासनाला आपले संसदेतील बहुमत सांभाळण्यासाठी वारंवार दक्ष राहावे लागले. त्याचाच परिणाम म्हणून वाजपेयीचे पहिले आघाडी सरकार १३ दिवसातच संपुष्टात आले. कारण जयललिताने पाठिंबा काढून घेतल्याने रालोआ सरकार कोसळून राजकिय अस्थिरतेला तोंड द्यावे लागले.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S ... COLLEGE ... Dist.Nanded



**सौदेबाजी संघराज्य :**

प्रादेशिक पक्ष आघाडी शासनास पाठींबा देत असतांना कांही शर्ती, अटी मान्य करुनच देत असल्याने सौदेबाजी संघराज्य निर्माण झालेले आहे. कॉंग्रेसच्या युपीए सरकार मध्ये तामिळनाडूचे करुणानिधी, बिहारचे लालूप्रसाद यादव, आणि रामविलास पासवान, महाराष्ट्राचे शरद पवार असे शक्तीशाली व प्रभावशाली नेते असल्याने कॉंग्रेसची जुनी एकतर्फी निर्णय घेण्याची परंपरा मोडीत काढून कोणतेही निर्णय घेतांना, नियुक्त्या करतांना संयुक्त बैठकीत घेण्यास सुरुवात झाली आहे.

**आघाडी राजकारणाची सकारात्मक बाजू :**

आघाड्यांच्या राजकारणामुळे नेत्यांची जबाबदारी वाढते पंतप्रधानाला सर्व पक्षांच्या नेत्याला विश्वासात घेवून सामुहिकपणे निर्णय वा धोरणे घ्यावे लागतात. अर्थात प्रादेशिक आणि राष्ट्रीय पक्षामध्ये मिळून-मिसळून कार्य करण्याची संस्कृती निर्माण झालेली आहे. राजकिय सत्तेचे विकेंद्रीकरण होवून विकास आणि अधुनिकीकरणाचे राजकारण सुरु होण्याची शक्यता आहे. आघाड्यांच्या राजकारणामुळे पंतप्रधानाची भुमिका कमजोर होवून संसदेची भुमिका प्रभावी ठरत आहे.

**नकारात्मक बाजू :**

आघाड्यांच्या राजकारणामुळे वारंवार राजकिय अस्थिरतेला तोंड द्यावे लागत आहे. राजकारणाचे गुन्हेगारीकरण होवून संसद आणि कार्यकारी मंडळ अपराध्यांच्या खिशात येत आहेत. संसदेत सध्या प्रभावी विरोधी पक्ष असल्याने वारंवार सत्तारुढ व विरोधी पक्षांमध्ये संघर्षाचे वातावरण निर्माण झाले आहे, मंत्रीमंडळातील सदस्य आपल्याच नेत्यावर म्हणजे पंतप्रधानावर टिका करीत आहेत. त्याचप्रमाणे सत्ताधारी पक्षांमध्ये एका निर्णयावर एकमत दिसत नाहीत तर विभिन्न मतमतांतरे दिसून येतात इत्यादी.

१) **धोरणात्मक निर्णयावर मर्यादा :**

आघाड्यांच्या शासनात संसदेतील धोरणात्मक निर्णयावर प्रादेशिक आणि इतर पक्षांच्या संमतीची मर्यादा पडते. एखाद्या पक्षाने संमती नाकारल्यास सरकारला धोरणात्मक निर्णय रद्द करावा लागतो किंवा धोरणावरुन एखादा पक्ष पाठिंबाही काढून घेतो. अशावेळी सरकारला अविश्वासाला तोंड द्यावे लागते. सध्या यु पी.ए. ने (२०११) रिटेल क्षेत्रातील ५०% परकिय गुंतवणूकीला तृणमुल कॉंग्रेसच्या ममता बॅनर्जी संमती नाकारल्याने, सरकारला माघार घ्यावी लागली.

२) **संवादाचा अभाव :**

संसदेत समाजहिताच्या प्रश्नावर सत्ताधारी आणि विरोधी पक्षामध्ये संवाद शांतता संयमाच्या मार्गाने होणे हे संसदिय शासन प्रणालीसाठी पोषक असते पण आघाड्यांच्या शासनामध्ये वारंवार वादविवादावरुन संसद दिर्घकाळ तहकुब करणे, तणावपूर्ण वातावरण निर्माण होणे यात सत्ताधारी पक्षांचा हटवादीपणा तसेच विरोधी पक्षांचा विरोधासाठी विरोध हे धोरण यामुळे संसदिय शासनातील संवादाची कमतरता दिसत आहे. यात पंतप्रधानांनी वादविवादाच्या विधेयकावर सर्व पक्षांची संयुक्त बैठक बोलावून प्रत्येक पक्षांचे मत जाणून सामाईक मुद्दे लक्षात घेवून विधेयक आणणे आवश्यक आहे.

३) **किचन कॅबिनेटची वाढती भुमिका :**

आघाड्यांच्या शासनात किचन कॅबिनेटची भुमिका सक्रिय झालेली आहे. त्यामुळे धोरणात्मक निर्णय हे किचन कॅबिनेटमध्येच होत आहेत. याचा उलट परिणाम म्हणून संसद केवळ संमतीची औपचारिक संस्था बनलेली आहे. संसदेत व्यापक चर्चा होत नाही, हे संसदिय शासनासाठी योग्य नाही.

४) **सरकारवर लोकांचा अविश्वास :**

सरकारी यंत्रणेतील मंत्री खासदार, प्रशासकिय अधिकारी यांच्यावरचा लोकांचा विश्वास हा पूर्णपणे गमाविलेला आहे. राजकिय नेते हे निवडणुकीत काळ्या पैशांचा वापर करतात, वाढता भ्रष्टाचार, गुणवत्ताहीन व्यक्ती, गुंड, गुन्हेगार संसद सदस्य बनल्यामुळे. नेत्यांचे जनहिताच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष, खासदारांना संसदिय कार्यप्रणाली माहित नसणे. त्यांचा गैरहजरपणा त्यामुळे सर्व सामान्यपणे जनतेत नेत्याविषयी, प्रशासकिय अधिकाऱ्यांविषयी आस्था कमी होत चाललेली आहे. हे संसदिय शासनासाठी धोकादायक आहे.

**संदर्भ :**

१) भारतीय राजनितीका बदलता परिदृश्य - मानचंद्र खंडेला - (गठबंधन सरकार : समस्याए और संभावनाये पृष्ठ क्र.८-९)
२) भारतातील प्रादेशिक पक्षांची भुमिका - डॉ.अशोक चौसाळकर (साधना - १४ ऑगस्ट १९९९, पृष्ठ क्र.२४, २५, २६)

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR * Dist.Nanded *

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 25 , Vol. 2 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

३) संविधान ओर सरकार - डॉ.सुरेन्द्र कुमार शर्मा (पृष्ठ क्र.१६२, १६४, १६६)

४) आघाडीच्या राजकारणातुन संघटित अराजकाकडे - ग.प्र.प्रधान (सकाळ-सप्तरंग-१९ डिसेंबर २००४)

५) निवडणूक २००४ - अस्वस्थांचा अविष्कार - डॉ.राजेश्वरी देशपांडे (समाजप्रबोधन पत्रिका - पृष्ठ क्र.७१,७३,७६)

६) राजस्थान पत्रिका (जयपुर) - 'गिरावट की हद' - कुलदिप नायर (२२ नोव्हें १९९८)

७) संसदिय समीक्षा - कुलदिप नायर (दै.लाकमत)

८) भारतीय शासन में प्रधानमंत्री की भुमिका - विमल शुक्ल (इंडिया टुडे ३१ मार्च १९९१)

९) भारतीय संसद की नयी दृष्टी - डॉ. लक्ष्मीमल्य सिंघवी (नवभारत टाईम्स)

१०) मॉडर्न डेमोक्रसी - लॉर्ड ब्राईस (कायदे मंडळाचा ऱ्हास)

११) विधिमंडळ - के.सी. व्हियर (संसदेच्या भुमिकेचा अभ्यास)

१२) धर्मयुग - सुनो सांसद - (डॉ.लक्ष्मीमल्ल सिंघवी, २० जाने. १९९० पृष्ठ ३९)

१३) इंडिया टुडे - (१५ जुलै १९९९ पृष्ठ ४३)

**Dr. Anil Chidrawar**
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded